विशेष असाधारण रजा योजना
मंजुरीबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

निर्णय क्रमांक :अरजा-२४०२/२५/सेवा-८
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक २५ ऑगस्ट, २००३.

| | |
|---|---|
| आवक नंबर | १९६०-०४ |
| | |
| कार्य विवरण नंबर | |

संदर्भ- शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.असंक १००१/प्र.क्र.२१/२००१/ वित्तीय सुधारणा, दिनांक १० सप्टेंबर २००१.

### निर्णय

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकःअरजा-२४०२/२५/सेवा-८, दिनांक ७ ऑक्टोबर २००२ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांना "विशेष असाधारण रजा योजना" लागू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत कर्मचाऱ्याने मागितलेली रजा मंजूर करण्याच्या संबंधात शासन खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे:-

२. ज्या कर्मचाऱ्यांनी विशेष असाधारण रजेची मागणी केलेली आहे त्या कर्मचाऱ्यांची/अधिकाऱ्यांची विशेष असाधारण रजा सरसकट नामंजूर करण्यात येऊ नये. तथापि, मागणी केलेली विशेष असाधारण रजा मंजूर केल्यामुळे रिक्त होणारे पद हे उच्चस्तरीय सचिव समितीने मान्य केलेल्या आकृतिबंधाच्या चौकटीत बसत असल्यास व असा आकृतिबंध संबंधित विभागाने शासन निर्णयाद्वारे निश्चित केला असल्यास अशा रिक्त होणा-या पदाबाबतची मागणी वित्त विभागाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे करावी. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे अशी मागणी करताना वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयास जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-३ (क) मधील विहित विवरणपत्रामध्ये माहिती पाठवावी. अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून समकक्ष कर्मचारी/अधिकारी उपलब्ध झाल्यास विशेष असाधारण रजेच्या कालावधीपर्यंत केवळ तात्पुरत्या स्वरुपात बदलीने सदर पद/पदे भरण्यात यावीत. विशेष असाधारण रजेचा कालावधी संपल्यानंतर अतिरिक्त संवर्ग कक्षाकडून उपलब्ध झालेले समकक्ष कर्मचारी/अधिकारी पुन्हा अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे परत करण्यात यावेत. विशेष असाधारण रजेच्या कालावधीत अतिरिक्त संवर्गातील कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे मासिक वेतन व भत्ते ज्या कार्यालयात त्यांची केवळ तात्पुरत्या स्वरुपात बदलीने नियुक्ती करण्यात आली आहे त्या कार्यालयाने काढावे. विशेष असाधारण रजेच्या कालावधीत

(कृ.मा.प.

रोटा/एच–742(18,000+50–8–03)1.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
13 JAN 2004

रिक्त होणारे पद/पदे प्रशासकीय दृष्टिकोनातून तात्पुरत्या स्वरुपात बदलीच्याद्वारे अतिरिक्त संवर्ग कक्षामधील उपलब्ध कर्मचारी/अधिकाऱ्यांमधूनच भरण्यास विशेष असाधारण रजा मंजूर करणारे अधिकारी सक्षम राहतील.

३. सदरहू आदेश हे वित्त विभागाच्या वित्तीय सुधारणा कार्यासन (अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३७८/०३ /वि.सु.-१,दिनांक ३०.४.२००३) व सामान्य प्रशासन विभाग (अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९८९/प्र.स./सेवा, दिनांक ३.५.२००३) यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वसन्त चौधरी,**
**शासनाचे उप सचिव**

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती),
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर (८० प्रती),
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई (४० प्रती),
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर (४० प्रती),
महालेखापाल (वाणिज्य लेखापरीक्षा), मुंबई ,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव, मंत्रालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, अपील शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मुख्य लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
राज्यपालांचे सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधिकाराखाली असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
वित्त विभागातील सर्व कार्यासने, (ग्रंथपाल ५ प्रती),
निवड नस्ती - कार्यासन सेवा-८.वित्त विभाग.

* पत्राने.

एच-742(18,000+50-8-03)1अ.